क्र.पोमसं/१४/६६/क्रि.सुमोटो १-१६//४७/२०१७ मुंबई, दि.०६.०४ .२०१७

**परिपत्रक**

विषय :- वरिष्ठ पोलीस अधिका-यांना महत्वाच्या खटल्यामध्ये खाजगी वकील नेमण्याचे अधिकार प्रदान करण्याच्या कार्यपध्दतीबाबत.

******

सोबत शासन शुध्दीपत्रक, गृह विभागक्र. एसपीपी-२०१२/प्र.क्र. ६६/पोल-१०, दि. २१.१०.२०१६ ची प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाही करिता जोडण्यात आली आहे.

(प्रभात कुमार)
विशेष पोलीस महानिरीक्षक (का.व सु.),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति.

महासचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व अपर पोलीस महासंचालक
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
सर्व परिक्षेत्रीस विशेष पोलीस महानिरीक्षक
उप पोलीस महानिरीक्षक, गडचिरोली, परिक्षेत्र,
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सह)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र

प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी,

पोलीस उप अधीक्षक, संगणक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२ यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक कृपया महाराष्ट्र पोलीस विभागातील संकेत स्थळावर फ्लॅश करण्यात यावे.

Subject :- Regarding amendment in Govt. Resolution No.DPP-2012/Pra. Kra.10/Pol-10,dt.12.05.2015

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना महत्वाच्या खटल्यामध्ये खाजगी वकील नेमण्याचा अधिकार प्रदान करण्याच्या कार्यपध्दतीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांकः एसपीपी-२०१२/प्र.क्र.६६/पोल-१०**
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
दुसरा मजला, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २१.१०.२०१६.

वाचा :- शासन निर्णय क्रमांक डीपीपी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०, दि. १२.०५.२०१५
(१४ पैकी शासन निर्णय क्रमांक ३)

**शुध्दीपत्रक:-**

विशेष सरकारी अभियोक्त्यांचे पॅनल तयार करणे तसेच वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या महत्वाच्या खटल्यामध्ये वकील नेमण्याचे अधिकार पोलीस आयुक्त / विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस अधीक्षक यांना संदर्भाधीन शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आले आहेत.

सदर शासन निर्णयात काही त्रुटी निदर्शनास आल्यामुळे सदर शासन निर्णयातील परिच्छेद १ मधील मुद्दा क्रमांक (अ) आणि (आ) यामध्ये नमूद कार्यपध्दतीत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. शासन आता संदर्भाधीन शासन निर्णयातील परिच्छेद क्र.१ मधील (अ) व (आ) येथील तरतूदींऐवजी पुढील तरतूदी करीत आहे:-

(i) पोलीस आयुक्त / विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस अधीक्षक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रासाठी विशेष सरकारी अभियोक्त्यांचे पॅनल तयार करण्यासाठीचा प्रस्ताव गृह विभागास सादर करवा. प्रस्ताव सादर करतांना संबंधीत उमेदवारांनी किमान १० वर्षे वकिलीचा अनुभव धारण केला आहे, या अटीची पूर्तता करणे आवश्यक राहिल. त्यानुसार पात्र उमेदवारांच्या पॅनलवरील नियुक्तीसाठीचा प्रस्ताव गृह विभागामार्फत विधि व न्याय विभागाकडे सादर करावा.

(ii) प्रत्येक आयुक्तालयासाठी / जिल्ह्यासाठी विशेष सरकारी वकीलांचे पॅनल तयार करण्याचा अंतिम अधिकार शासनास राहील.

(iii) प्रकरणपरत्वे पॅनलवरील वकीलाची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव संबंधीत पोलीस आयुक्त / विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस अधिक्षक यांनी विधि व न्याय विभागास थेट पाठवावा व त्यास शासनाच्या विधि व न्याय विभागाची मान्यता घ्यावी.

(iv) हे विशेष सरकारी वकीलांचे पॅनल फक्त सत्र न्यायालया पुरते मर्यादित राहील. हे शासन शुध्दीपत्रक शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६१०२११८००३७२७२९ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dattatray Santaram Patil

Digitally signed by Dattatray Santaram Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Dattatray Santaram Patil
Date: 2016.10.21 18:02:24 +05'30'

**(द. सं. पाटील)**

**उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव (गृह) विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
४. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
५. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव, मत्रालय, मुंबई.
७. मा. राज्यमंत्री गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (अपिल व सुरक्षा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव व विधि परामर्श, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव, विशेष, मंत्रालय, मुंबई.
११. महाप्रबंधक, मा. उच्च न्यायालय, मुंबई.
१२. सर्व पोलीस आयुक्त
१३. विशेष पोलीस महानिरीक्षक, सर्व परिक्षेत्र
१४. सर्व अपर पोलीस महासंचालक
१५. सर्व जिल्हाधिकारी
१६. सर्व प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश
१७. सर्व पोलीस अधीक्षक
१८. संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१९. उप सचिव (पोल १०), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०. सर्व सहसचिव/उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१. निवड नस्ती